# महाराष्ट्र विधानसभा

## चौथे अधिवेशन, २०२२

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**शुक्रवार, दिनांक ३० डिसेंबर, २०२२ / पौष ९, १९४४ ( शके )**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **महसूल, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(२)** | **वने, सांस्कृतिक कार्ये, मत्स्यव्यवसाय मंत्री** | |
| **(३)** | **रोजगार हमी योजना, फलोत्पादन मंत्री** | |
| **(४)** | **कृषी मंत्री** | |
| **(५)** | **सहकार, इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** | |
| **(६)** | **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ३१**

---

**उस्मानाबाद जिल्ह्यात महात्मा गांधी रोजगार हमी योजनेच्या कामांमध्ये गैरव्यवहार झाल्याबाबत**

**(१) * ५०३६९ श्री.कैलास घाडगे पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उस्मानाबाद जिल्ह्यात महात्मा गांधी रोजगार हमी योजनेच्या (एमआरईजीएस) कामांमध्ये गैरव्यवहार झाल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी दोषी अधिकाऱ्यांनाच चौकशी अधिकारी म्हणून नेमण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे व त्यानुसार दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे :** (१) हे, खरे आहे.

(२) व (३) हे अंशत: खरे आहे.

सदर प्रकरणी गटविकास अधिकारी पंचायत समिती उस्मानाबाद यांच्याकडे तक्रार प्राप्त झाल्यानंतर सहा.गटविकास अधिकारी पं.स.उस्मानाबाद यांना चौकशी करण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. तथापि, सदर प्रकरणी ते दोषी असल्याचे निर्दशनास आल्याने जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांनी गटविकास अधिकारी पंचायत समिती, उस्मानाबाद यांना चौकशी करुन अहवाल सादर करण्याबाबत कळविण्यात आले होते. याप्रकरणी गटविकास अधिकारी पंचायत समिती, उस्मानाबाद यांनी चौकशी करुन चौकशी अहवाल सादर केलेला आहे. प्रकरणी गैरव्यवहार झाल्याचे निर्दशनास आले असून दोषी कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या सेवा समाप्त करण्यात आल्या असून इतर नियमित दोषी अधिकारी / कर्मचारी यांना निलंबित करुन त्यांचेवर शिस्तभंगविषयक कारवाई करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यात दुधाकरीता एफ.आर.पी. व रेव्हेन्यू शेअरिंगचे धोरण लागू करण्याबाबत**

**(२) * ५१९८५ श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव) :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात दुधाकरिता एफ.आर.पी. व रेव्हेन्यू शेअरिंगचे धोरण लागू करावे या मागण्यांसाठी दुध उत्पादक शेतकरी संघर्ष समिती सातत्याने संघर्ष करत असून सदर मागण्यांसाठी समितीने मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य व दुग्धविकास मंत्री, महाराष्ट्र राज्य यांना निवेदन दिले असल्याचे माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दुध खरेदी दरांमधील अस्थिरतेमुळे राज्यात दुध व्यवसायाच्या विकासाला मर्यादा येत असून राज्यात एकूण संकलित होत असलेल्या दुधापैकी ७६ टक्के दुध खाजगी दुध कंपन्यांकडे संकलित होऊ लागल्याने या क्षेत्रात खाजगी दुध कंपन्यांची एकाधिकारशाही निर्माण होत असल्याने खाजगी कंपन्या संगनमत करून खरेदीचे दर वारंवार कमी जास्त करत असल्याने दुध उत्पादक शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान होत असतानाही शासनाचे दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील दुध उत्पादकांना दुधाला एफ.आर.पी. व रेव्हेन्यू शेअरिंगचे धोरण लागू करून गाईच्या दुधाला ४५ रुपये तर म्हशीच्या दुधाला ६५ रुपये दर देऊन विक्री करताना केवळ ना नफा, ना तोटा या धर्तीवर परिपूर्ण धोरण शासन तयार करणार काय त्यानुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) होय, हे खरे आहे.

(२), (३) व (४) राज्यातील दुधाकरिता Maharashtra Regulation of Milk Price (Supplied to Milk Projects/Dairies) Act, २०२१ तयार करण्याच्या अनुषंगाने त्यासाठी करावी लागणारी आर्थिक तरतुद, सक्षम अंमलबजावणी यंत्रणा, कायद्याची व्यावहारीक व वैधानिक व्यवहार्यता तपासण्यासाठी मंत्रिमंडळाची उपसमिती दिनांक २३ मे, २०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये स्थापित करण्यात आली आहे.

त्यानुषंगाने इतर राज्यात अस्तित्वात असलेले कायदे/नियम, अंमलबजावणी यंत्रणा याबाबतची माहिती घेण्यात येत आहे. सदरची माहिती प्राप्त झाल्यानंतर त्याबाबतची पुढील कार्यवाही करण्याचे नियोजित आहे.

-----------------

**बुलढाणा शहरातील सागर कृषि केंद्रात डीएपी खताची पिशवी शेतकऱ्यांना घेण्याकरिता एक वेगळे खत घेण्याची सक्ती केल्याबाबत**

**(३) * ५१३१३ श्री.संजय गायकवाड (बुलढाणा) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा शहरातील सागर कृषि केंद्रात डीएपी खतांची पिशवी शेतकऱ्यांना खरेदी करताना एक वेगळे खत घेण्याची सक्ती करीत असल्याची तक्रार जिल्हा कृषि अधिकाऱ्यांकडे माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान एका राजकीय पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी कृषी अधिकारी कार्यालयात ठीय्या आंदोलन केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सर्वसामान्य शेतक-यांना वेगळे खत घेण्याची सक्ती केल्यामुळे त्यांना आर्थिक भुर्दंड सोसावा लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे व त्यानुसार यासंदर्भात संबंधित केंद्र चालकांवर तसेच याप्रकरणी दुर्लक्ष करणाऱ्या शासकीय अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अब्दुल सत्तार :** (१) होय, हे खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

(३) सदर प्रकरणी करण्यात आलेल्या चौकशीत परवानाधारक खत विक्रेत्याने डीएपी खतासोबत इतर खते शेतकऱ्यांना सक्ती करुन विक्री केल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे मे. सागर सिड्स ॲन्ड फर्टिलायझर यांचा किरकोळ खत विक्री परवाना दिनांक ०१/०६/२०२२ ते दिनांक १०/०६/२०२२ या कालावधीकरीता तात्पुरता निलंबित करण्यात आला होता. परंतु, खरीप हंगामामध्ये बुलढाणा जिल्हयातील शेतकऱ्यांची खताची निकड आणि खत विक्री केंद्राने खते लिकिंग पध्दतीने शेतकऱ्यांना विक्री न करण्याबाबत दिलेले हमीपत्र विचारात घेऊन निलंबित केलेला खत विक्री परवाना सक्त ताकीद देवून दिनांक १०/०६/२०२२ पासून पूर्ववत करण्यात आलेला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**परभणी जिल्ह्यातील ४४ मंडळांचा अग्रिम पिकविमा रकमेसाठी समावेश केल्याबाबत**

**(४) * ५०१६४ डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी जिल्ह्यात सलग २१ दिवस पावसाचा खंड झाल्याने शेतकऱ्यांच्या उत्पादनात मोठी घट झाली असूनही प्रशासनाने केवळ ८ मंडळाचाच अग्रिम रकमेसाठी समावेश केला असून उर्वरीत ४४ मंडळांचा अग्रिम रकमेसाठी समावेश करण्यात आला नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अग्रिम रकमेसाठी उर्वरीत ४४ मंडळांचा समावेश न करण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी जिल्ह्यातील विविध पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी तहसिलदार, कृषी मंत्री, महाराष्ट्र राज्य व महसूल मंत्री, महाराष्ट्र राज्य यांची भेट घेऊन शेतकऱ्यांना आर्थिक नुकसान भरपाई देण्याबाबत तसेच उर्वरीत ४४ मंडळांना अग्रिम पीकविमा मिळण्यासाठी समावेश करण्यात यावा, अशी मागणी माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे व मागणीनुसार शासनाने कोणती निर्णयात्मक कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अब्दुल सत्तार :** (१) हे खरे आहे.

(२) खरीप हंगाम २०२२ हंगामातील प्रतिकुल परिस्थिती या बाबी अंतर्गत पावसातील ३ आठवडे व त्यापेक्षा जास्त पावसाचा खंड नसल्यामुळे सदर ४४ महसूल मंडळांमध्ये केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनेमधील मुद्दा क्र.२१.४.२ अन्वये चालू वर्षाच्या अपेक्षीत उत्पादनामध्ये गत ७ वर्षातील सरासरी उत्पादनाच्या तुलनेत ५० टक्के पेक्षा जास्त घट अपेक्षीत नसल्याने अधिसूचनेत समावेश करण्यात आला नाही.

(३) हे खरे आहे.

(४) परभणी जिल्ह्यात योजनेच्या मार्गदर्शक सूचनेनुसार सोयाबीन पिकाकरीता ८ महसूल मंडळामध्ये हंगामातील प्रतिकुल परिस्थिती या बाबी अंतर्गत अधिसूचना निर्गमित करण्यात आलेली आहे. त्यानुसार दिनांक १९.१२.२०२२ अखेरपर्यंत ७३८१४ शेतकरी अर्जदारांना नुकसान भरपाई रक्कम रु.४०.७१ कोटी निश्चित करण्यात आली असून त्यापैकी ७२५७६ शेतकरी अर्जदारांना नुकसान भरपाई रक्कम रुपये ४०.०९ कोटी वाटप करण्यात आले असून उर्वरीत नुकसान भरपाई रक्कम रुपये ०.६३ कोटी वाटपाची कार्यवाही सुरु आहे

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील मालाड (पश्चिम) येथील भूमी क्लासिक बिल्डींग या गृहप्रकल्पाची इमारत निष्कासित करण्याबाबत

**(५) * ५३२२५ श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई उपनगरातील मालाड-बोरीवली (पश्चिम) येथील स. नं. ५०४ न. भू. क्र. १४०६ ग १ येथे मे. एव्होरा बिल्डर्स आणि डेव्हलपर्स यांनी उभारलेल्या भूमी क्लासिक बिल्डींग गृह प्रकल्पाची अनधिकृत इमारत निष्कासित करून सदर मिळकत प्रत्यार्पित करून देण्याबाबत उप विभागीय अधिकारी, मुंबई पश्चिम उपनगरे यांनी तहसीलदार यांना माहे ऑगस्ट, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान आदेश दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांनी मा. उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार इमारत निष्कासित करण्याची कारवाई करून सदर जमिनी आदिवासी कुटुंबास प्रत्यार्पित करण्यासंदर्भात निर्देश दिले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांच्याकडे श्री. सुनील गायकवाड यांनी दिनांक ४ फेब्रुवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास निवेदन देऊन आदिवासी कुटुंबास जमिन प्रत्यार्पित करून देण्याबाबत अर्ज केला होता, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त निवेदनाच्या व मा. उच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील :** (१), (२), (३) व (४) मौजे मालाड, ता.बोरीवली येथील स.नं.५०४ न.भू.क्र. १४०६ ग १ येथे मे. एव्होरा बिल्डर्स आणि डेव्हलपर्स यांनी उभारलेल्या भूमी क्लासिक बिल्डींग गृह प्रकल्पाची अनधिकृत इमारत निष्कासित करुन देण्याबाबत उपविभागीय अधिकारी, मुंबई पश्चिम उपनगरे व जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर या कार्यालयाकडून कोणतेही आदेश ऑगस्ट, २०२२ मध्ये देण्यात आलेले नाहीत. तसेच इमारत निष्कासित करण्याबाबत मा. उच्च न्यायालयाचे कोणतेही आदेश दिसून येत नाहीत.

तथापि, श्री. सुनिल गायकवाड यांच्या दिनांक ०४/०२/२०२२ रोजीच्या अर्जाच्या अनुषंगाने मौजे मालाड, ता. बोरीवली येथील स.नं.५०४ ही मिळकत प्रत्यार्पित करुन मिळणेबाबत जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर कार्यालयाकडे विनंती केली होती. त्यानुषंगाने जिल्हाधिकारी मुंबई उपनगर कार्यालयाने दिनांक १५/०२/२०२२ रोजीच्या पत्रान्वये उप विभागीय अधिकारी, मुंबई पश्चिम उपनगर यांना अभिलेख तपासून आवश्यक असल्यास स्थळ पाहणी करुन स्वयंस्पष्ट अभिप्रायासह परिपूर्ण अहवाल सादर करण्याबाबत कळविले होते.

त्यानुसार उपविभागीय अधिकारी, पश्चिम उपनगर यांनी दिनांक १३/१२/२०२२ रोजी जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांना अहवाल सादर केलेला आहे. सदर अहवालानुसार पुढील नियमोचित कार्यवाही करण्याची दक्षता जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर कार्यालयाने घेतली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पर्ससीन मासेमारीवर बंदी असतानाही अनेक मच्छिमार बेकायदेशीररित्या मासेमारी करीत असल्याबाबत

**(६) * ५२९७३ श्री.श्रीनिवास वनगा (पालघर), श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **मत्स्यव्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शासनाने पर्ससीन मासेमारीवर दिनांक ५ फेब्रुवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास निर्बंध घालून देखील पर्ससीनधारक मच्छिमार बेकायदेशीररित्या मासेमारी करीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पालघर जिल्ह्यातील सातपाटीत पर्ससीन एलईडी लाईट, क्षमतेपेक्षा जास्त मासेमारी तसेच यांत्रिकीकरणामुळे मत्स्यव्यवसाय धोक्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच तळाशील ते आचरा पर्यंतच्या समुद्रात साडेबारा वावच्या आतमध्ये पर्ससीनने बेकायदेशीर मासेमारी केली जात असल्याबाबत अखिल महाराष्ट्र मच्छिमार कृती समितीच्या पदाधिकारी यांनी सहाय्यक मत्स्य आयुक्त कार्यालय, मालवण याठिकाणी तक्रार केली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार पर्ससीन व यांत्रिक मासेमारी पद्धतीवर आळा घालण्यासाठी शासनाने कोणती निर्णयात्मक कार्यवाही वा कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) सदर विषयी सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय, सिंधुदूर्ग कार्यालयास लेखी निवेदन प्राप्त नाही. परंतु दुरध्वनीद्वारे पारंपारिक मच्छिमार यांच्यामार्फत तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत.
(४) सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय, सिंधुदूर्ग कार्यालयामार्फत दिनांक २३ नोव्हेंबर, २०२१ ते दिनांक ३० नोव्हेंबर, २०२२ या कालावधीत एकूण १४ अनधिकृत नौकांवर कारवाई केलेली असून त्यात २ एलईडी व ९ पर्ससीन मासेमारी नौकांचा समावेश आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बीड येथील तहसील कार्यालयातील नायब तहसिलदार यांनी केलेल्या अनियमिततेची चौकशी करण्याबाबत

**(७)** * **५५५८४ श्री.संदिप क्षिरसागर (बीड) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बीड येथील नायब तहसिलदार श्री.डोके यांच्याकडे सन २०२१-२२ मध्ये तहसिलदार पदाचा अतिरिक्त कार्यभार असताना त्यांनी संजय गांधी निराधार योजना, पुरवठा विभाग, गौण खनिज इत्यादी कामांमध्ये आर्थिक अनियमितता केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महाराष्ट्र जमिन महसुल अधिनियम, १९६६ चे कलम १५०/४ नुसार मौजे बीड फेरफार क्र. ८३०७ व ८३११ मधील सर्वेमध्ये नियमबाह्य फेरफार केले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत तक्रारदार श्री.गणेश नरेश जाधव यांनी आक्षेप नोंदवून देखील श्री.डोके यांनी तक्रारदाराला कोणतीही पूर्वसूचना न देता नियमबाह्यरित्या एकतर्फी निर्णय घेतला, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १६ ऑक्टोबर, २०२२ रोजीच्या पत्रान्वये चौकशी करण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, त्यानुसार संबंधित तहसिलदाराच्या कार्यकाळातील कामांची व मालमत्तेची लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत चौकशी केली आहे काय,
(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) हे खरे नाही.

श्री. डोके, नायब तहसिलदार यांचेकडे दिनांक २२.०९.२०२१ ते दिनांक ०५.०३.२०२२ या कालावधीत तहसिलदार पदाचा अतिरिक्त कार्यभार होता. याबाबत प्राप्त निवेदनाच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, बीड यांनी सादर केलेल्या अहवालावरुन संबंधित नायब तहसिलदार यांच्या कार्यकाळात कोणतीही अनियमितता झाल्याचे निष्पन्न झालेले नाही.
(२), (३), (४), (५) व (६) याबाबत मा. वि.स.स. यांच्या निवेदनाच्या अनुषंगाने उपविभागीय अधिकारी, बीड यांच्यामार्फत करण्यात आलेल्या चौकशीमध्ये, सदर प्रकरण बीड तरफ खोड येथील स.नं.१०५/आ या जमिनीशी निगडीत विवादग्रस्त फेरफार क्र.८३०७ व ८३११ याबाबतचे आहे.

सदर अर्धन्यायिक प्रकरणी श्री. गणेश जाधव या व्यक्तीने त्यांचा कोणताही हितसंबंध नसताना विषयाधिन फेरफारासंदर्भात आक्षेप अर्ज दिल्यानंतर याबाबत सुनावणीअंती त्यांचा अर्ज महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम, १९६६ मधील कलम १५० येथील तरतूदीनुसार निकाली काढण्यात आला असून उक्त फेरफारांची नोंद घेण्यात आली आहे. तसेच या प्रकरणी उपविभागीय अधिकारी, बीड यांच्यामार्फत केलेल्या चौकशीमध्ये कोणतीही अनियमितता आढळून आली नसल्याने कारवाईचा प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**भंडारा जिल्ह्यात विनापरवाना व बनावट मद्य विक्री होत असल्याबाबत**

**(८) * ५५९१३ श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा) :** सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भंडारा जिल्ह्यात हॉटेल्समध्ये व धाब्यावर विनापरवाना व बनावट दारू विक्री प्रकरणी राज्य उत्पादन शुल्क विभागाने गत सहा महिन्यात तब्बल ९७ लक्ष ४१ हजार ६९४ रुपयांची अवैध दारू जप्त केली तसेच ६२५ आरोपींना अटक करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त जिल्ह्यात दिवसेंदिवस इतर राज्यातून बनावट मद्य विक्रेत्याचे प्रमाण वाढतच आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बनावट मद्य विक्री केल्यामुळे जिल्ह्यातील नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय

(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करुन बनावट मद्य विक्रीला आळा घालण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शंभूराज देसाई :** (१) भंडारा जिल्ह्यात राज्य उत्पादन शुल्क विभागामार्फत दिनांक ०१.०४.२०२२ ते ३०.०९.२०२२ या सहा महिन्याच्या कालावधीत अवैध मद्य निर्मिती, विक्री, वाहतूक याविरोधात एकूण ६१४ गुन्हे नोंद करून ६२४ आरोपींना अटक केली असून एकूण रु. ९७,४१,६९४/- चा मुद्देमाल जप्त केला आहे. यामध्ये हॉटेल अणि ढाब्यांवरील अवैध मद्याबाबत केलेल्या कारवायांचा समावेश आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) राज्य उत्पादन शुल्क विभागाद्वारे अवैध मद्य निर्मिती, विक्री व संलग्न बाबींना आळा घालण्याच्या दृष्टीने आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क कार्यालयात अविरत नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात आला आहे. तसेच, नागरिकांना तक्रार करण्यासाठी टोल फ्री क्रमांक व व्हॉट्सअप क्रमांक प्रसिद्ध करण्यात आला आहे.

पोलीस विभागाच्या समन्वयाने माहितीचे आदान-प्रदान करून हातभट्टी दारु निर्मिती व विक्रीवर विभागामार्फत नियमितपणे कारवाई करण्यात येते. हॉटेल व ढाब्यांची वेळोवेळी तपासणी करून काही आक्षेपार्ह आढळून आल्यास गुन्हा नोंद करण्यात येतो. तसेच, अशा स्वरुपाच्या गुन्ह्यातील सराईत गुन्हेगारांवर विभागामार्फत नियमितपणे प्रतिबंधात्मक कारवाई केली जाते.

परराज्यातून अवैध मद्य वाहतूक रोखण्यासाठी परराज्यांच्या सीमेवर संपूर्ण राज्यात एकूण १२ कायमस्वरुपी तपासणी नाके विभागामार्फत कार्यरत आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नागपूर (जि.नागपूर) येथील महाज्योती संस्थेतर्फे मागावसर्गीय विद्यार्थी टॅब व नोट्सपासून वंचित असल्याबाबत

**(९) * ५३०७४ श्री.मनोहर चंद्रिकापूरे (अर्जुनी-मोरगांव), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व) :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर (जि.नागपूर) येथील महाज्योती संस्थेतर्फे महाज्योती संस्थेतर्फे गुणवत्ता प्राप्त ओबीसी, एनटी, एसबीसी या मागावसर्गीय विद्यार्थ्यांना जे.ई.ई., नीट व एमसीईटीसाठी मोफत प्रशिक्षण दिले जात असून या विद्यार्थ्यांना सन २०२२-२३ या वर्षाकरिता टॅब व नोट्स शासनाकडून वाटप करण्यात आले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाज्योती या संस्थेने एका कंपनीसोबत संगनमत करुन टॅब (TAB) खरेदी निविदा प्रक्रियेत अनियमितता करुन करोडो रुपयांचा गैरव्यवहार केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करण्यासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १३ व १४ सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मोफत टॅब व नोट्स न मिळाल्याने विद्यार्थ्यांची अडचण होत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार ऑनलाईन प्रशिक्षणार्थींना टॅब व नोट्स उपलब्ध करुन दोषींवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) अंशत: खरे आहे.

महाज्योती संस्थेमार्फत स्पर्धा परीक्षेचे ऑनलाईन प्रशिक्षण देण्यासाठी नोंदणीकृत प्रशिक्षणार्थींना टॅब देण्याकरीता GEM पोर्टलवर मागविण्यात आलेल्या निविदा प्रक्रियेबाबत तक्रारी प्राप्त झाल्याने सदर प्रक्रिया स्थगित करुन स्वयंस्पष्ट अहवाल मागविण्यात आला होता.

व्यवस्थापकीय संचालक यांनी टॅब खरेदी प्रकरणी सादर केलेला खुलासा समाधानकारक असल्याने शासनस्तरावर दिनांक २०/१०/२०२२ अन्वये मान्य करून नोंदणीकृत विद्यार्थ्यांना टॅब वाटप करण्यास मंजूरी देण्यात आली आहे.

(४), (५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## दापोली (जि.रत्नागिरी) तालुक्यातील केळशी उंबरशेत येथील भारजा नदीवर विना परवाना वाळू उपसा होत असल्याबाबत

**(१०) * ५५३५६ श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दापोली (जि. रत्नागिरी) तालुक्यातील बेकायदेशीर वाळू उपसावर बंदी असतानाही केळशी व उंबरशेत येथील भारजा नदीवर सक्शन पंपाद्वारे गत एक वर्षापासून विनापरवाना वाळू उपसा सुरु असून सदर उपशामुळे मच्छिमारांचे नुकसान होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त गावातून दररोज ४ ते ८ ब्रासची अत्याधुनिक डंपरने बेकायदेशीर वाळूची वाहतुक होत असल्याने गावातील रस्तेही खराब असल्यामुळे उक्त गावातील ग्रामस्थांनाही त्रास होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त ठिकाणी विना परवाना सक्शन पंपाद्वारे होत असलेल्या वाळू उपसा व बेकायदेशीर वाळू वाहतूकीबाबत तेथील ग्रामस्थांनी तहसिदार, दापोली जिल्हाधिकारी, रत्नागिरी आदींकडे सातत्याने लेखी तक्रारी करुनही या प्रकरणी स्थानिक महसूली प्रशासनाकडून कोणतीच कारवाई झाली नसल्याने शासनाच्या सर्व नियमांचे उल्लंघन करुन वाळूमाफिया बेकायदेशीररित्या वाळू व्यवसाय करत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार विनापरवाना वाळू उपसा व बेकायदेशीर वाळूची वाहतूक करणाऱ्या विरोधात शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील :** (१), (२), (३) व (४) दापोली तालुक्यातील मौजे उंबरशेत ग्रामपंचायत हद्दीत भारजा नदीमध्ये सक्शन पंपाद्वारे वाळू उपसा होत असल्याबाबत प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने तहसिलदार, दापोली यांच्या तपासणी पथकामार्फत अचानक तपासणी केली असता त्याठिकाणी विनापरवाना वाळू उत्खनन, वाहतुक किंवा अनधिकृत वाळू साठा व वाळू उत्खननाची साधने आढळून आली नाही.

दिनांक ०५/१२/२०२२ रोजी तहसिलदार दापोली यांच्या पथकामार्फत तपासणी केली असता ०.७५ ब्रास वाळू साठा जप्त करुन संबंधीतांवर दापोली पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल केला आहे. तसेच दापोली तालुक्यात एकूण २१ प्रकरणामध्ये रु. २९,९५,०००/- इतका दंड करण्यात आला असून ५ फौजदारी स्वरुपाच्या कारवाया करण्यात आल्या आहेत.

जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांच्या आदेशान्वये तालुका पातळीवर भरारी पथकाची नियुक्ती करण्यात आली असून विनापरवाना वाळू उत्खनन व वाहतुक होऊ नये याची वेळोवेळी तपासणी करण्यात येते, तसेच महत्वाच्या ठिकाणी चेक पोस्ट देखील बसविण्यात आले आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## चांदूरबाजार (जि.अमरावती) येथे बनावट रेती व मातीमिश्रीत खतांची विक्री कृषी केद्रांवर केली जात असल्याबाबत

**(११) * ५२८१३ श्री.प्रताप अडसड (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चांदूरबाजार (जि.अमरावती) येथे कृषी विभागामार्फत बनावट रेती व मातीमिश्रीत खतांची विक्री कृषी केद्रांवर केली जात असल्याचे दिनांक १८ जून, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त ठिकाणी शेतक-यांना डीएपी (खत) असल्याचे सांगून रुपये ११५० बॅग प्रमाणे घरपोच बोगस खतांची विक्री केली जात आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात कृषी केद्रांवर कृषी अधिकाऱ्यांनी पंचनामे करण्यात येऊनही कोणत्याही प्रकारची कारवाई अद्यापपर्यंत करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अब्दुल सत्तार :** (१) व (२) हे खरे नाही.

अमरावती विभागातील चांदूरबाजार, जि. अमरावती येथे कृषि विभागामार्फत कृषि केंद्रावर रेती व मातीमिश्रीत बनावट खते विक्री करण्यात आले नाही.

तथापि, अनधिकृतरित्या काही व्यक्ती कडून शेतकऱ्यांना घरपोच बनावट डिएपी खताची विक्री होत असल्याचे दिनांक १७ जून, २०२२ रोजी शेतक-यांशी झालेल्या चर्चेत निदर्शनास आले आहे.
(३) हे खरे नाही.
(४) होय.

सदर प्रकरणी संबंधितांविरुध्द पोलीस स्टेशन, चांदूरबाजार येथे गुन्हा क्र. ३६२ दिनांक १७/०६/२०२२ व पोलीस स्टेशन बलगांव येथे ०२०० दिनांक २१/०६/२०२२ रोजी पोलीस गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. तसेच, मे. महेश

कृषि सेवा केंद्र, मौजे खरवाडी, ता. चांदुरबाजार, जि. अमरावती यांचा रासायनिक खत विक्री परवाना रद्द करण्यात आलेला आहे. याप्रकरणी पुढील तपास पोलीस यंत्रणेमार्फत सुरु आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**उल्हासनगर (जि.ठाणे) येथील कुशिवली धरणासाठी**
**भूसंपादित केलेल्या जमिनींचा मोबदला मिळण्याबाबत**

**(१२) *५०९२१ श्री.किसन कथोरे (मुरबाड), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उल्हासनगर (जि.ठाणे) येथील प्रांत कार्यालयांतर्गत हाजीमलंग परिसरातील कुशिवली धरण क्षेत्रासाठी एकूण ८५.४० हेक्टर जमिनीचे संपादन करताना एकूण ५३ जमीनधारकांना ११ कोटी ५१ लाख रुपयांचे वाटप करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर जमिनीच्या भूसंपादनाचा मोबदला अधिकाऱ्यांच्या संगनमताने मूळ जमीन मालकांऐवजी त्यांच्या मर्जीतील व्यक्तींना बनावट कागदपत्राद्वारे देवून मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार केल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी झालेल्या गैरव्यवहारात सुमारे ३० ते ४० आरोपींना मध्यवर्ती पोलीस स्टेशन उल्हासनगर येथे अटक करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) हे खरे आहे.
(२) हे अशंत: खरे आहे. सदर प्रकरणी भूसंपादनाची प्रक्रिया विहीत कार्यपध्दतीचा अवलंब करून पार पाडण्यात आली आहे. तथापि अनधिकृत व्यक्तींनी बनावट आधारकार्ड, बनावट पॅनकार्ड तयार करून त्याआधारे बँकेत खोटी केवायसी करून बँकेत खाते उघडून त्याआधारे शासकीय यंत्रणेची फसवणूक करून भूसंपादन मोबदला रक्कम हस्तगत करण्याचे कृत्य केल्याचे माहे ऑक्टोबर, २०२१ मध्ये उपविभागीय अधिकारी उल्हासनगर कार्यालयाच्या निदर्शनास आले आहे. सदर प्रकरणी उपविभागीय अधिकारी उल्हासनगर यांचे कार्यालयाने मध्यवर्ती पोलीस स्टेशन, उल्हासनगर येथे फिर्यांद क्र.३३२/२०२१, १८०/२०२२, १९८/२०२२, २०१/२०२२, २०४/२०२२ असे ५ गुन्हे दाखल केले आहे.
(३) प्रस्तुत प्रकरणी दाखल पाच विविध गुन्ह्यात एकूण ४३ व्यक्तींना अटक करण्यात आली आहे.
(४) सदर प्रकरणी उपायुक्त (भूसंपादन) कोकण विभाग यांनी चौकशी करुन शासनास अहवाल सादर केला आहे. सदर अहवालामध्ये "उपविभागीय अधिकारी, उल्हासनगर यांचे कार्यालय निवृत्त नायब तहसिलदार, श्री.मोहन खिसमतराव व इतर ४२ आरोपी यांचा सदर गुन्ह्यांमध्ये सहभाग असल्याने अटक करण्यात आलेली आहे. सदर प्रकरणी उपरोक्त सर्व कार्यालयीन अभिलेख व विविध अहवाल यांचे अवलोकन केले असता सदर प्रकरणामध्ये तत्कालीन उपविभागीय अधिकारी, श्री.जगतसिंग गिरासे अथवा अन्य अधिकारी व कर्मचारी यांचा समावेश असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत नाही" असे निष्कर्ष नोंदवले आहेत.
(५) अशी बाब नाही.

-----------------

**मुखेड (जि.नांदेड) येथे कृषी कार्यालयाने ठिबक व तुषार योजनेंतर्गत बोगस लाभार्थ्यांची निवड करुन केलेला गैरव्यवहार**

**(१३) * ५४५६३ श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुखेड (जि.नांदेड) येथे कृषी कार्यालयाने ठिबक व तुषार सिंचन योजनेंतर्गत पात्र व गरजू लाभार्थ्यांना डावलून बोगस लाभार्थ्यांची निवड करुन गैरव्यवहार केल्याचे माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे व त्यानुसार संबंधितांविरुद्ध गुन्हे दाखल करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अब्दुल सत्तार :** (१) हे खरे नाही. प्रधानमंत्री कृषि सिंचन योजनेंतर्गत अर्जदार शेतकऱ्यांची महाडीबीटी पोर्टलवर संगणकीय पध्दतीने लॉटरी सोडत काढण्यात येते. सोडतीत निवड झालेल्या शेतकऱ्यांनी विहित मुदतीत कागदपत्रे अपलोड न केल्यास अर्ज पोर्टलवर रद्द होतात. या योजनेंतर्गत सन २०२१-२२ व सन २०२२-२३ या दोन आर्थिक वर्षातील नांदेड जिल्ह्यातील मुखेड तालुक्याचा अनुदान अदायगीचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | बाब | सन २०२१-२२ | सन २०२२-२३ |
|---|---|---|---|
| १ | सोडतीत निवडलेले अर्ज | ४१९९ | २६६६ |
| २ | रद्द झालेले अर्ज | २४९० | १२३० |
| ३ | प्रक्रियेसाठी उपलब्ध अर्ज (१-२) | १७०९ | १४३६ |
| ४ | अनुदान अदा केलेले लाभार्थी | ९५६ | ० |
| ५ | अदा केलेले अनुदान (रु. कोटींमध्ये) | ५.८५ | ० |
| ६ | अनुदान प्रक्रियेमध्ये असलेले लाभार्थी (३-४) | ७५३ | १४३६ |
| ७ | अनुदान अदायगीसाठी पात्र लाभार्थी | ३७७ | १८ |
| ८ | विविध टप्प्यांवर असलेले अनुदान प्रक्रियेतील लाभार्थी (६-७) | ३७६ | १४१८ |

सदर योजनेंतर्गत सन २०२२-२३ या आर्थिक वर्षासाठीच्या दुसऱ्या हप्त्यासाठी रुपये ३०० कोटींच्या मागणीचा प्रस्ताव कृषि आयुक्तालयाच्या दिनांक २९.११.२०२२ रोजीच्या पत्रान्वये केंद्र शासनास सादर केला आहे. सदर निधी प्राप्त होताच पात्र लाभार्थ्यांना अनुदान वितरित करण्यात येईल.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विदर्भात संत्री फळांच्या व्यवस्थापनासाठी जैविक आणि रासायनिक बुरशीनाशकांचा पुरवठा ५० टक्के अनुदानावर करण्याबाबत**

**(१४) * ५१३१० श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **फलोत्पादन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) विदर्भात अतिवृष्टी व बुरशीजन्य रोगांच्या प्रादुर्भावाने संत्रा उत्पादक शेतकऱ्यांना फळगळतीच्या समस्येला सामोरे जावे

लागत असल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त समस्येमुळे शेतकऱ्यांचे सुमारे ५०० कोटी रुपयाचे नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार संत्री फळाच्या व्यवस्थापनासाठी जैविक आणि रासायनिक बुरशीनाशकांचा पुरवठा ५० टक्के अनुदानावर करण्याबाबत तसेच नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) अंशत: खरे आहे
प्रादुर्भावग्रस्त भागात कीड/रोग नियंत्रणासाठी ५० टक्के अनुदान व जास्तीत जास्त रुपये ७५०/- प्रति हेक्टर याप्रमाणे बुरशीनाशकाचा पुरवठा करण्यात आला आहे.
नागपूर विभागामध्ये जून ते ऑक्टोबर, २०२२ कालावधीत अतिवृष्टीमुळे बाधित झालेल्या संत्रा/मोसंबी पिकांच्या १३१०६.९७ हे. आर. क्षेत्राकरीता रु. ३५.३८ कोटी निधी वितरीत करण्यात आला आहे.
तसेच अमरावती विभागामध्ये जून ते ऑक्टोबर २०२२ या कालावधीत अतिवृष्टी व पुरामुळे बाधीत झालेल्या संत्रा/मोसंबी/ लिंबुवर्गीय फळपिकांखालील ५६१२९.६४ हे. आर. क्षेत्राकरीता रुपये १९०५४.१२ लाख व सततच्या पावसामुळे बाधीत झालेल्या २४९४०.९४ हे. आर. क्षेत्राकरीता रुपये १२.२४ लाख इतका निधी वितरीत करण्यात आला आहे.तसेच उर्वरित अतिवृष्टीमुळे फळपिकांच्या झालेल्या नुकसानीकरीता विधीमंडळाच्या चालू अधिवेशनात मदत व पुनर्वसन विभागामार्फत पुरक मागणी सादर करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## येळवी, खैराव व माडग्याळ (ता.जत, जि.सांगली) येथे विषारी घोणस अळीच्या प्रादुर्भावामुळे पिकांचे नुकसान झाल्याबाबत

**(१५) * ५१५१८ श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) येळवी, खैराव व माडग्याळ (ता.जत, जि.सांगली) येथे घोणस अळीचा मोठ्या प्रमाणात प्रादुर्भाव वाढल्यामुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान होत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरील घोणस अळी विषारी असल्याने मनुष्याला चावल्यास त्याच्या जिवावर बेतू शकते, त्यामुळे शेतकऱ्यांच्या जीविताचे व पिकांचे नुकसान टाळण्यासाठी सदर अळीचा प्रादुर्भाव रोखणे अत्यंत आवश्यक आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे व त्यानुसार विषारी घोणस अळीचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना वा कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अब्दुल सत्तार :** (१) हे अंशत: खरे आहे.
येळवी, खैराव, माडग्याळ येथे घोणस अळीचा प्रादुर्भाव हा शेतातील बांधावर असणाऱ्या गवतावरती अल्प प्रमाणात दिसून आला असून, काही प्रमाणात आंबा या पिकावरती आढळून आला आहे. इतर शेतपिकावर याचा परिणाम दिसून आला नाही.
(२) हे खरे नाही. घोणस अळीमुळे मानवास किंवा शेत पिकांवरती कोणत्याही प्रकारचे नुकसान झालेले नाही.

(३) क्षेत्रीय स्तरावर घोणस अळीचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी करावयाच्या उपायोजनांबाबत राज्यस्तरावरून वेळोवेळी प्रेस नोट मार्फत जनजागृती करण्यात आली. तसेच सांगली जिल्ह्यात कृषी विभागाचे अधिकारी/ कर्मचारी व कृषी विद्यापीठांच्या शास्त्रज्ञांनी क्षेत्रीय भेटी देऊन घोणस अळी उपाययोजना व समज/ गैरसमज याविषयी शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात आले
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**दिल्लीत केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या (युपीएससी) परिक्षेची तयारी करण्यासाठी आलेल्या विद्यार्थ्यांना "महाज्योती" निधी देण्यास टाळाटाळ करीत असल्याबाबत**

**(१६) * ४९९२६ श्री.लहू कानडे (श्रीरामपूर) :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दिल्लीत केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या (युपीएससी) परिक्षेची तयार करण्यासाठी "महाज्योती" मार्फत ८०० विद्यार्थ्यांची प्रवेश परीक्षेनंतर निवड झाली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरील विद्यार्थ्यांना "महाज्योती" मार्फत निधी न दिल्यामुळे ३० हजारांहून अधिक विद्यार्थ्यांच्या आहार व निवासाचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर विद्यार्थ्यांना वेळेत आर्थिक मदत न दिल्यास त्यांना या परिक्षेची तयारी करणे अडचणीचे ठरणारे आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे व त्यानुसार विद्यार्थ्यांना महाज्योतीकडून आर्थिक सहाय्य मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) हे खरे नाही.
महाज्योती संस्थेमार्फत दिल्ली येथे युपीएससी च्या प्रशिक्षणासाठी निवड केलेल्या ८२९ उमेदवारांना प्रशिक्षण संस्थेत रुजु करून प्रती उमेदवार १८०००/- एकवेळ प्रमाणे रुपये १,४९,२२,०००/- इतक्या रकमेच्या आकस्मिक निधीचे प्रदान माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये करण्यात आलेले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**सोलापूर जिल्ह्यात शेतकऱ्यांची भेसळयुक्त रासायनिक खतांमुळे फसवणूक होत असल्याबाबत**

**(१७) * ५४४५८ श्री.बबनराव शिंदे (माढा) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर जिल्ह्यात रासायनिक व विद्राव्य खतांच्या किंमती वाढल्यामुळे दाणेदार खतांबरोबरच विद्राव्य खतांमध्ये भेसळ सुरु असून शेतकऱ्यांना दिलेल्या १२:६१:० या जातीचे यारा कंपनीच्या बॅगेमध्ये तपासणीनंतर मीठ आढळून आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ३५०० रुपये किंमतीला खरेदी केलेल्या बोगस खतांमुळे शेतकऱ्यांची आर्थिक फसवणूक होत असल्याचे माहे जुलै, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(३) तसेच पडसाळी (ता.उत्तर सोलापूर) येथील शेतकरी ज्ञानेश्वर शिरसाट यांनी यारा या विद्राव्य खत कंपनीची एक बॅग खरेदी केली व प्रयोगशाळेत खताची तपासणी केली असता त्यामध्ये मीठ असल्याचे आढळून आल्याने पोलीसांत तक्रार

देऊनही कंपनीविरुद्ध कोणतीही कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अब्दुल सत्तार :** (१) व (२) हे खरे नाही.
यारा फर्टीलायझर, पुणे या कंपनीचे पाण्यात विद्राव्य खताची हुबेहुब नक्कल करुन, बनावट खत बॅगेत भरुन शेतकऱ्याची फसवणूक करत असल्याचे दिनांक १५.०७.२०२२ रोजी आढळून आले आहे.
(३) व (४) हे खरे नाही.
मौजे पडसाळी, ता. उत्तर सोलापूर येथील शेतकरी श्री. ज्ञानेश्वर शिरसाट यांनी यारा फर्टीलाझर कंपनीचे लेबल असलेले पाण्यात विद्राव्य १२:६१:० हे खत श्री. सुनील सुपाते यांचेकडून खरेदी केले. सदर खत बोगस असलेबाबत श्री.शिरसाट यांनी तक्रार केली होती. सदर तक्रारीचे अनुषंगाने चौकशी केली असता यारा फर्टीलायझर, पुणे या कंपनीचे पाण्यात विद्राव्य खताची हुबेहुब नक्कल करुन, बनावट खत बॅगेत भरुन शेतकऱ्याची फसवणूक करत असल्याचे आढळून आले आहे. खत विक्रेते श्री.सुपाते यांचेकडे खत उत्पादन व विक्री परवाना नसल्याने त्यांचेविरुध्द सोलापूर ग्रामीण पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा क्र. ५२५, दिनांक १५/०७/२०२२ दाखल करण्यात आला आहे. तसेच, यारा फर्टीलायझर, पुणे या कंपनीला कारणे दाखवा नोटीस देऊन खुलासा मागविला आहे. सदर कंपनीने फिर्यादीमध्ये आवश्यक ते सहकार्य करण्याचे लेखी अभिवचन दिलेले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बागलाण (जि.नाशिक) व मालेगाव (ता.सटाणा) येथे बनावट रासायनिक खतांची विक्री होत असल्याबाबत

**(१८) * ५२५६८ श्री.नितीन अर्जुन (ए.टी.) पवार (कळवण) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बागलाण (जि.नाशिक) येथे दोन कंपनीच्या बनावट रासायनिक खतांची विक्री होत असल्याचा प्रकार माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आला आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच मालेगाव (ता.सटाणा, जि.नाशिक) येथे रोड परिसरातील मे.सचिन एजन्सीज या दुकानातून किसान शक्ती फर्टीलायझर पेस्टीसाईड प्रा.लि. व मे.व्दारका ॲग्रो ताहराबाद या दोन दुकानातून बनावट रासायनिक खते विक्री होत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत दोषी आढळून आले आहे काय व त्यानुसार संबंधितांवर कारवाई करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अब्दुल सत्तार :** (१) हे खरे नाही.
(२) मे. सचिन एजन्सीज, मालेगाव रोड, नाशिक आणि मे. द्वारका ॲग्रो ताहराबाद या खत विक्री केंद्रामधून घेतलेले नमुने अप्रमाणित आढळून आले आहेत.
(३) नाशिक जिल्हयातील मे. सचिन एजन्सीज मालेगाव रोड, ता. बागलाण, जि.नाशिक या कृषि विक्री केंद्राची दिनांक ०६/१०/२०२२ रोजी तपासणी करण्यात आली. सदर तपासणीमध्ये मे. किसान शक्ती फर्टिलायझर्स अँण्ड पेस्टीसाईड प्रा.लि. भरुच, गुजरात या कंपनीचे सिंगल सुपर फॉस्फेट फोर्टीफाईड विथ झींक व बोरान चा नमुना विश्लेषणाअंती वॅाटरसोल्युबल फॉस्फेट (WSP) या घटकात अप्रमाणित असल्याचे आढळून आले आहे. सदर प्रकरणी मे. सचिन

एजन्सीज मालेगाव रोड, ता. बागलाण, जि.नाशिक व मे. किसान शक्ती फर्टिलायझर्स अँण्ड पेस्टीसाईड प्रा. लि. भरुच, गुजरात यांना दिनांक १/११/२०२२ अन्वये कारणे दाखवा नोटीस देण्यात आली. त्यावर प्राप्त खुलाशानुसार उत्पादक कंपनीने खत नियंत्रण आदेश १९८५ मधील खंड ३२ नुसार अपिलीय अधिकारी, नाशिक यांचेकडे पुन: विश्लेषणासाठी अर्ज दाखल केला आहे.

तसेच, मे. द्वारका ॲग्रो ताहराबाद या विक्री केंद्रामध्ये ऑरगॅनिक मॅन्युअर सेंद्रिय खत आर्द्रता या घटकात अप्रमाणित असल्याचे आढळून आले. त्यामुळे, खत नियंत्रण आदेश १९८५ मधील तरतूदीनुसार उत्पादक कंपनी गोल्डन अपोर्चिनिटी, नाशिक यांना सक्त ताकीद देण्यात आली. तसेच, मे.द्वारका ॲग्रो ताहराबाद यांनी तपासणीतील त्रुटींची पूर्तता न केल्याने त्यांचा परवाना रद्द करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी अधिकाराचा गैरवापर करुन विना निविदा केलेली पदभरती

**(१९) * ५२५७८ श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड), श्री.हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील इतर मागास बहुजन कल्याण विकास विभागाच्या अंतर्गत विधी अधिकारी, वरिष्ठ तंत्रज्ञ, सिस्टीम ॲनालिसिस्ट, डेटा एन्ट्री ऑपरेटर, संगणक सहाय्यक, संचालक ऑपरेटर, वाहनचालक, पहारेकरी, सफाई कामगार ही २४७ पदे कंत्राटी पद्धतीने भरण्यासाठीचे कंत्राट इतर मागास वर्ग कल्याणासाठी स्थापन केलेल्या महाज्योती संस्थेला विश्वासात न घेता पुणे येथील ब्रिक्स इंडिया प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीला देण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच औरंगाबाद येथील इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या अधिकाऱ्यांच्या मनमानी कारभारामुळे ज्ञानदीप या संस्थेलाही मोठ्या प्रमाणावर विनानिविदा कंत्राट देण्यात आल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी दिनांक ४ ते १८ ऑगस्ट, २०२२ रोजी वा त्यामागील तारखेच्या सह्या घेऊन पदभरतीचे कंत्राट दिले गेले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या संगनमताने विनानिविदा पदभरतीचे कंत्राट व इतर कंत्राटाची उच्चस्तरीय चौकशी करण्याची मागणी राष्ट्रीय इतर मागास वर्ग महासंघाच्यावतीने त्याच सुमारास करण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने उच्चस्तरीय चौकशी करण्याबाबत तसेच संबंधित दोषींवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे :** (१) व (२) हे खरे नाही, शासनाच्या कार्यालयात कंत्राटी मनुष्यबळाचा पुरवठा करण्याबाबत उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाने ई निविदा प्रक्रिया राबवून निवड केलेल्या कंपन्यांच्या पॅनलमध्ये मे.ब्रिस्क् कंपनीचा समावेश असून, उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या दिनांक १८/६/२०१४ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसारच इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या मंजूर सुधारित आकृतिबंधातील बाह्य यंत्रणेद्वारे भरावयाची पदे कंत्राटी स्वरुपात भरण्यासाठी विनानिविदा मे. ब्रिस्क् यांना मान्यता देण्यात आली आहे.

(३) हे खरे नाही.

(४), (५) व (६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मलकापूर (जि.बुलढाणा) येथील दि मलकापूर अर्बन बँक लि.च्या संचालकाने केलेला गैरव्यवहार**

**(२०) * ५४९१० श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.राजु पारवे (उमरेड), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मलकापूर (जि.बुलढाणा) येथील दि मलकापूर अर्बन बँक लि.च्या संचालकांनी केलेल्या गैरव्यवहाराबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी पुराव्यानिशी तक्रार शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सहकार आयुक्त व निबंधक कार्यालयाच्या मार्गदर्शक सूचनाचे पालन न करता संचालकाच्या पाल्यास अध्यक्ष पदावर नियमबाह्यपणे नियुक्त करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे :** (१) होय. दि मलकापूर अर्बन बँक लि. या बँकेच्या गैरव्यवहाराबाबत श्री. राजेश एकडे, वि.स.स. यांनी तत्कालीन मा. मंत्री (सहकार) यांचेकडे दिनांक १६.०७.२०२० रोजीच्या पत्रान्वये तक्रार दाखल केली होती.

(२) व (३) विधानसभा सदस्यांच्या उपरोक्त तक्रारीतील मुद्यांबाबत चौकशी करण्यासाठी सहकार आयुक्तांच्या निर्देशानुसार जिल्हा उपनिबंधक, स.सं, बुलढाणा यांनी जिल्हा विशेष लेखापरिक्षक, वर्ग-१, बुलढाणा यांची दिनांक ०४.१२.२०२० रोजीच्या आदेशान्वये नियुक्ती केली. सदर चौकशी अधिकारी यांनी सादर केलेल्या अहवालात बँकेत गैरव्यवहार झाल्याची बाब निदर्शनास आली नसल्याचे नमुद केले आहे.

दरम्यान दि मलकापूर अर्बन बँकेच्या सन २०१६ मध्ये पार पडलेल्या निवडणूकीमध्ये श्री. राहुल संचेती बिनविरोध निवडून आले होते. त्यानुसार संचालक मंडळाच्या सदस्यामधुनच दिनांक २७.०५.२०१६ ला त्यांची अध्यक्ष पदावर निवड करण्यात आली. दिनांक २१.०३.२०२० रोजी श्री.राहुल संचेती यांनी अध्यक्ष पदाचा राजीनामा दिला. त्यानंतर दिनांक ०९.०४.२०२० रोजीच्या अध्यक्ष निवड सभेमध्ये श्री.चैनसूख संचेती यांची अध्यक्ष म्हणून बिनविरोध निवड करण्यात आली.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मौजे जेऊर (ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर) येथील एडव्हेंचर पार्कच्या कामांमध्ये गैरव्यवहार झाल्याबाबत**

**(२१) * ५०४९२ श्री.अजित पवार (बारामती), श्री.हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे जेऊर (मसाई पठार पायथा) (ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर) येथील एडव्हेंचर पार्कच्या कामांमध्ये गैरव्यवहार झाल्याच्या लेखी तक्रारी शासनाकडे करण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, परिक्षेत्र वन अधिकारी, पन्हाळा यांच्यावतीने राबविण्यात येत असलेल्या या एडव्हेंचर पार्क योजनेत अंदाजे ४ कोटी ७६ लाखांचा अपव्यय झाला असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी सन २०१६ ते २०१९ या कालावधीत राबविण्यात येणाऱ्या विकास आराखड्याच्या योजनांमध्ये फेरबदल करुन गैरमार्गाने अनुदान खर्च करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे व त्यानुसार दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही, मौजे जेऊर ता.पन्हाळा येथील निसर्ग पर्यटन व एडव्हेंचर पार्क कामांकरीता सन २०१६-१७ ते २०१८-१९ या कालावधीसाठी रक्कम रुपये ४७६.८५ लाखाचा ढोबळ आराखडा तयार करण्यात आलेला होता. सन २०१५-१६ ते २०२१-२२ पर्यंत मौजे जेऊर ता.पन्हाळा येथील निसर्ग पर्यटन व एडव्हेंचर पार्क कामांकरीता रक्कम रुपये १४१.५० लक्ष इतका निधी खर्च झालेला असून, गैरमार्गाने अनुदान खर्च करण्यात आलेले नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अहमदपूर व चाकूर (जि.लातूर) येथे वनपरिक्षेत्र अधिकारी व वनपाल अधिकाऱ्यांनी संगनमताने शासनाच्या निधीचा केलेला गैरव्यवहार

**(२२) * ५५१३० श्री.बाबासाहेब पाटील (अहमदपूर), श्री.संजय बनसोडे (उदगीर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चाकूर (जि.लातूर) वनपरिक्षेत्रात सन २०२१ ते २०२२ मध्ये सी.पी.टी. (टी.सी.एम) सी.सी.टी व डिप सी.सी.टी. या योजनेंतर्गत कामात बोगस मजूर दर्शवून गैरव्यवहार केल्याचे दिनांक ०७ नोव्हेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच अहमदपूर वनपरिक्षेत्रातील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या मुख्यालयात अनुपस्थिती व हलगर्जीपणामुळे जंगलक्षेत्रात वृक्षतोडीचे प्रकार वाढीस लागले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच मौजे अजनसोंडा, चापोली, तीर्थवाडी, सारणवाडीर या जंगलक्षेत्रात सन २०२२ करिता MREGS अंतर्गत विविध प्रजातीच्या रोप लागवडी कामात बोगस मजुरांची नावे दर्शवून गैरव्यवहार केल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणांबाबत स्थानिक ग्रामस्थांनी जिल्हाधिकारी, लातूर यांचेकडे तक्रारी करुनही अद्याप कारवाई करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणांची शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) हे खरे नाही.

सामाजिक वनीकरण विभाग, लातूर अंतर्गत अहमदपूर वनपरिक्षेत्रातील चाकूर वनपरिमंडळात (जि. लातूर) सन २०२१-२०२२ मध्ये सी.पी.टी. (टी.सी.एम) सी.सी.टी व डिप सी.सी.टी योजनेअंतर्गत कोणतीही कामे घेण्यात आलेले नाहीत.

तथापि, अहमदपूर (प्रादेशिक) वनपरिक्षेत्रात २०२१-२२ मध्ये १२० हेक्टर सी.सी.टी., १०० हेक्टीर सी.पी.टी. (टी.सी.एम) कामे घेण्यात आलेली आहेत. सदर कामांत बोगस मजूर दर्शवून गैरव्यवहार केल्याचे निदर्शनास आलेले नाही.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

सामाजिक वनीकरण विभाग तसेच प्रादेशिक वन विभागाकडून मौजे अजनसोंडा, चापोली, तीर्थवाडी, सारणवाडीर या वनपरिक्षेत्रात सन २०२२ करिता MREGS अंतर्गत कोणतीही कामे घेण्यात आलेले नाहीत. सबब गैरव्यवहाराचा प्रश्नच उद्‌भवत नाही.

(४) हे खरे नाही.

उक्त प्रकरणाबाबत स्थानिक ग्रामस्थांनी जिल्हाधिकारी, लातूर यांचेकडे केलेल्या कोणत्याही तक्रारी सामाजिक वनीकरण विभाग तसेच प्रादेशिक विभागाकडे प्राप्त झालेल्या नाहीत.
(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**वाशिम जिल्ह्यात प्रधानमंत्री कृषी सिंचन (PMKSY) २०२१-२२ योजनेंतर्गत महाडीबीटी पासवर्डची चोरी व गैरवापर केल्याबाबत**

**(२३) * ५३६२९ श्री.राजकुमार पटेल (मेळघाट) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वाशिम जिल्ह्यात प्रधानमंत्री कृषी सिंचन (PMKSY) २०२१-२२ योजनेंतर्गत संबंधित अधिकारी रजेवर असताना अन्य अधिकाऱ्यांच्या संगनमताने महाडीबीटी पासवर्डची चोरी व गैरवापर तसेच बनावट सह्यांच्याआधारे अनुदान वाटप करण्यात आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या गंभीर प्रकरणाची तक्रार तालुका कृषी अधिकारी यांना करुन सुध्दा सोयीचे अहवाल तयार करुन दोषींवर कोणतीही कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अब्दुल सत्तार :** (१) व (२) हे खरे नाही.
(३) या प्रकरणी केलेल्या चौकशीत तथ्य न आढळल्याने कारवाईचा प्रश्न उद्भवत नाही
(४) विलंब झालेला नाही.

-----------------

**राज्यातील पूरग्रस्त व महापुरामुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांचे कर्ज माफ करण्याबाबत**

**(२४) * ५५२६६ डॉ.देवराव होळी (गडचिरोली) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात यावर्षी सर्वत्र अतिवृष्टी व महापुरामुळे शेतकऱ्यांच्या पिकाचे प्रचंड नुकसान झालेले असल्याने शेतकरी कर्ज भरण्यास असमर्थ आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने पूरपिडीत व नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत जाहीर केली आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी करुन शेतकरी कर्ज भरण्यास असमर्थ असल्यामुळे शेतकऱ्यांना संपूर्ण कर्ज माफी करण्याबाबत कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे :** (१) अंशतः खरे आहे.
(२) शासन निर्णय दिनांक २२.०८.२०२२ अन्वये जून ते ऑक्टोबर, २०२२ या कालावधीतील अतिवृष्टी, पूर यासारख्या नैसर्गिक आपत्तीमुळे राज्यात विविध जिल्ह्यात होणाऱ्या शेतीपिकांच्या नुकसानीकरीता बाधित शेतकऱ्यांना खालील प्रमाणे वाढीव दराने निविष्ठा अनुदान स्वरुपात मदत प्रदान करण्यास शासन मान्यता देण्यात आली आहे.

| बाब | प्रचलित दर | मदतीचे वाढीव दर |
|---|---|---|
| जिरायत पिकांच्या नुकसानीसाठी | रु. ६८००/- प्रति हेक्टरी, २ हेक्टरच्या मर्यादेत | रु. १३,६००/- प्रति हेक्टरी, ३ हेक्टरच्या मर्यादेत |
| बागायत पिकांच्या नुकसानीसाठी | रु. १३,५००/- प्रति हेक्टरी, २ हेक्टरच्या मर्यादेत | रु. २७,०००/- प्रति हेक्टरी, ३ हेक्टरच्या मर्यादेत |
| बहूवार्षिक पिकांच्या नुकसानीसाठी | रु. १८,०००/- प्रति हेक्टरी, २ हेक्टरच्या मर्यादेत | रु. ३६,०००/- प्रति हेक्टरी, ३ हेक्टरच्या मर्यादेत |

याअंतर्गत माहे नोव्हेंबर, २०२२ अखेर रुपये ६१९४.७६ कोटी निधी वितरीत करण्यात आला आहे.
(३) सद्यस्थितीत कर्जमाफीचा प्रस्ताव विचाराधीन नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**खेड (जि.पुणे) तालुक्यातील चासकमान धरणासह अनेक धरणामधील मासेमारीसाठी घातक औषधांचा वापर होत असल्याबाबत**

**(२५) * ५५०८९ श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी) :** सन्माननीय **मत्स्यव्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खेड (जि.पुणे) तालुक्यातील चासकमान धरणासह अन्य धरणांमधील मासेमारीसाठी 'लम्बड सायहलोथ्रीन' (कराटे) नावाच्या औषधाचा मोठ्या प्रमाणात वापर होत असल्याचे दिनांक २२ नोव्हेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त औषधामुळे येथील पर्यावरण व जैवविविधतेला धोका निर्माण झाला असून याकडे प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याने संबधितांवर कारवाई करण्याची मागणी तेथील स्थानिक नागरिकांकडून होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून संबंधित दोषींविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**भांबुर्डा व पुणे वनपरिक्षेत्रातील वन्यजीवांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने उपाययोजना करण्याबाबत**

**(२६) *४९५५७ श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :
(१) पुणे जिल्ह्यात वनविभाग प्रशासनाच्या दुर्लक्षतेमुळे तसेच वनपरिक्षेत्र अधिकारी निवासी राहत नसल्याने वन परिक्षेत्रात मोठ्या प्रमाणात अनियमितता होत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त अधिकाऱ्यांच्या नियंत्रणाअभावी वन्यजीवांची शिकार, भांबुर्डा व पुणे राखीव वनपरिक्षेत्रात अनधिकृत बांधकामे, अतिक्रमणे, व्यावसायिक वापर अशी अनेक प्रकरणे घडत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे व त्यानुसार संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१), (२) व (३) हे खरे नाही.
पुणे वनवृत्तामध्ये पुणे, सोलापूर, जुन्नर व भोर हे चार वन विभाग असून विभागातील वनपरिक्षेत्र अधिकारी व कर्मचाऱ्यांमार्फत मुख्यालयात राहून त्यांचे कार्यक्षेत्रात नियमितपणे गस्त करणे तसेच वन संवर्धन व संरक्षण १९७२ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करण्यात येते.
पुणे वन विभागांतर्गत पुणे व भांबुर्डा वन परिक्षेत्रामध्ये निदर्शनास आलेली अतिक्रमणे निष्कासीत करण्यात आली आहेत अथवा प्रकरण न्यायप्रविष्ट करण्यात येत आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मानवत (जि.परभणी) येथे बनावट किटकनाशक जप्त केल्याबाबत

**(२७) * ५०२१८ डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मानवत (जि.परभणी) येथे शेतकरी व सामाजिक कार्यकर्त्यांच्या सहाय्याने पोलीसांनी बोगस निविष्ठा विक्री प्रकरणात औषध कंपनीच्या ५ प्रतिनिधींना अटक करुन १७ लाखांची बोगस औषधे दिनांक ९ ऑगस्ट, २०२२ रोजी वा त्यासुमारास जप्त केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष होत असून बोगस औषध पकडल्यानंतर कृषी विभागामार्फत तपासणी विषयक कोणतीही कारवाई झाली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात चौकशी करुन शासनाने बनावट निविष्ठा विक्री प्रकरणातील संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अब्दुल सत्तार :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही. बनावट किटकनाशक प्रकरणी मानवत पोलीस स्टेशन येथे बनावट किटकनाशकाचे निरीक्षकामार्फत नमुने घेण्यात आले असून, सदर प्रकरणी गुन्हा क्र. ०२४४/२०२२ दिनांक ११/०८/२०२२ रोजी दाखल करण्यात आला आहे.
(३) मानवत पोलीस स्टेशन येथे Bio-R-३०३ चे १२० लिटर व धानुका ॲग्रोटेक कंपनीचा इमामेक्टीन बेंझोईट २५० ग्रॅम वजनाच्या १६ बॉटल एकूण रुपये ४,६५,३७६/- रक्कमेचा माल जप्त करण्यात आला आहे. याबाबत, मानवत पोलीस स्टेशन मार्फत अधिक तपास चालू असून, १२ आरोपींना अटक करण्यात आली आहे. आरोपींकडून रुपये १७.३९ लाख रुपयांच्या बनावट औषधांच्या ४७ पेट्या जप्त करण्यात आल्या आहेत. तसेच सीआरपीसी कलम ४१ प्रमाणे बनावट माल तयार करणारे व माल घेणारे किरकोळ विक्रेते दुकानदार यांचा तपास चालू आहे. सबब, कृषि विभागातील अधिकारी व कर्मचारी यांचेवर कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## भंडारा जिल्ह्यातील नाकाडोंगरी वनपरिक्षेत्रातील रानडुक्करांमुळे धानपिकांचे होत असलेले नुकसान

**(२८) * ५५९१५ श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भंडारा जिल्ह्यात यावर्षीच्या खरीप हंगामात रानडुक्करांमुळे धान पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असल्याचे

निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नाकाडोंगरी वनपरिक्षेत्रातील पवणारा, बघेडा, चिचोली येथील शेत जंगलालगत असल्याने रानडुक्करांच्या कळपांमुळे या भागात शेत पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शेतीचे पंचनामे करुन लाखोंचे नुकसान होऊनही अगदी तुटपुंजी नुकसान भरपाई शेतकऱ्यांना देण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त ठिकाणी दिवसेंदिवस रानडुक्करांची संख्या वाढत असल्याने वन विभागाने त्वरित रानडुक्करांचा बंदोबस्त करुन शेतकऱ्यांना झालेल्या नुकसानीबाबत भरीव आर्थिक मदत देण्याची शेतक-यांकडून मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) भंडारा वन विभागात माहे जून, २०२२ ते ऑक्टोबर, २०२२ या कालावधीत रानडुक्करांमुळे शेतपीक नुकसानीची एकुण १२१२ प्रकरणे निदर्शनास आली असून प्रचलित नियमानुसार नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना रूपये ८२,०७,८२७/- इतके अर्थसहाय्य अदा करण्यात आले आहे.
(२) भंडारा वन विभागा अंतर्गत नाकाडोंगरी वनपरिक्षेत्रात सन २०२२-२३ मध्ये माहे नोव्हेंबर, २०२२ पर्यंत रानडुक्करांनी शेतपिकांचे नुकसान केल्याच्या एकूण ६३ प्रकरणांमध्ये प्रचलित शासन निर्णयातील तरतुदीनुसार दिनांक १२.१२.२०२२ पर्यंत एकूण रुपये ३,७०,२१०/- इतके अर्थसहाय्य अदा करण्यात आले आहे. त्यापैकी मौजा पवणारा गावातील ४ प्रकरणात रुपये २६,८९०/-, मौजा चिचोली गावातील १ प्रकरणात रुपये ३,१००/- व मौजा बघेडा गावातील ६ प्रकरणात रुपये ३७,३८०/- इतके अर्थसहाय्य अदा करण्यात आले आहे.
(३) व (४) हे खरे नाही.
(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुरबाड (जि. ठाणे) तालुक्यातील मे.टेक्नोक्राफ्ट इंडस्ट्रीज इंडिया लि. या कंपनीने जमीन अकृषक न करता बेकायदेशीरपणे इमारत बांधकाम केल्याबाबत

**(२९) * ५०९४३ श्री.किसन कथोरे (मुरबाड), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुरबाड (जि. ठाणे) तालुक्यातील एन.टी.टी.एफ.इंजिनिअर कॉलेज पशेणी (देवपे) (सर्वे नं.४५ व ५०) येथील मे.टेक्नोक्राफ्ट इंडस्ट्रीज इंडिया लि.यांनी जमीन अकृषक न करता व शासकीय अटी शर्तींची पूर्तता न करता बेकायदेशीरपणे इमारतीचे बांधकाम केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) प्रश्नाधीन जमिनीवर संबंधित भोगवटदार यांनी अनधिकृत बांधकाम केल्यामुळे अपर तहसिलदार (अकृषक), कल्याण यांनी महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ चे कलम ४५ अन्वये तात्पुरती दंडात्मक कारवाई केलेली आहे.

तसेच संबंधित जमीनधारक यांना महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ५२,५३ व ५४ अन्वये जिल्हाधिकारी, ठाणे यांनी दिनांक १४.१२.२०२२ अन्वये नोटीस बजावण्यात आली असून त्यानुसार पुढील कार्यवाही करण्याचे नियोजित आहे.

-----------------

**राज्यात विशेषत: रायगड, माहिम, कुलाबा, विशाळगड, लोहगड या प्रमुख गडकिल्ल्यांवर मोठ्या प्रमाणात अतिक्रमण झाले असल्याबाबत**

**(३०) * ५४६४९ श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.महेश बालदी (उरण), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम), श्री.चिमणराव पाटील (एरंडोल), श्री.सचिन कल्याणशेट्टी (अक्कलकोट) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषत: रायगड, माहिम, कुलाबा, विशाळगड, लोहगड या प्रमुख गडकिल्ल्यांवर मोठया प्रमाणात अतिक्रमण झाले असल्याचे माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त किल्ल्यांवर ऐतिहासिक संदर्भ नसतानाही बांधण्यात आलेल्या बेकायदेशीर बांधकाम व अतिक्रमणाकडे शासनाचे दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या अतिक्रमणांसंदर्भात स्थानिक पोलिस स्टेशन, पुरातत्व विभाग यांच्याकडे स्थानिक नागरिकांनी, हिंदू जनजागृती समितीच्या पदाधिकाऱ्यांनी, लोकप्रतिनिधी, दुर्गप्रेमींनी व विविध संघटनांनी अनेक वेळा तक्रारी केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) होय हे खरे आहे, प्रश्नाधीन किल्ल्यांवर अतिक्रमण बऱ्याच वर्षापासून झाले असून यापैकी रायगड, कुलाबा, लोहगड हे किल्ले भारतीय पुरातत्व विभागाच्या अखत्यारीत असून माहिम व विशाळगड किल्ले राज्य संरक्षित स्मारक आहेत.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे आहे.

(४) रायगड, कुलाबा, लोहगड किल्ल्यांवरील अतिक्रमण काढण्याबाबत भारतीय पुरातत्व विभागाच्यामार्फत संबंधित जिल्हा प्रशासन व पोलीस यंत्रणेला विनंती करण्यात आली आहे. माहिम किल्ल्यावरील अतिक्रमण काढण्याची कार्यवाही बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत करण्यात येत आहे. तसेच विशाळगड किल्ल्यावरील अतिक्रमण काढण्याची कार्यवाही जिल्हा प्रशासनाच्या सहकार्याने राज्य पुरातत्व विभागाकडून करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**खेड (जि.पुणे) तालुक्यातील चाकण एमआयडीसी व आळंदी परिसरात बेकायदेशीर प्लॉट विक्री करून शासनाचा महसूल बुडविल्याबाबत**

**(३१) * ५५६४३ श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खेड (जि.पुणे) तालुक्यातील चाकण एमआयडीसी व आळंदी परिसरात चारही बाजूच्या अकरा ते बारा किलोमीटर अंतरावरील ग्रामपंचायतीच्या हद्दीत शासनाचा कोट्यवधी रुपयांचा महसूल बुडवून शेतजमिनींचे बेकायदा एका-एका

गुंठ्याचे प्लॉट पाडून विक्री होत असल्याचे माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त भागात मोठ्या प्रमाणात बेकायदेशीर प्लॉट विक्री होत असतानाही प्रशासनाने यावर कोणतीही कारवाई केली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

तथापि जिल्हाधिकारी, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली पीएमआरडीए, महसूल विभाग, पोलीस विभाग व मुद्रांक शुल्क विभाग यांची दिनांक १०.०५.२०२२ रोजी बैठक घेऊन अनधिकृत विकसनधारकांवर कारवाई करण्याचे निश्चित करण्यात आले आहे. तसेच अनधिकृत प्लॉटिंग मधील मंजूर फेरफार अपिलात घेऊन रद्द करण्याचे तसेच महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ मधील तरतुदींच्या अनुषंगाने आणि आयपीसी व सीआरपीसी कायद्यान्वये अनधिकृत विकसनांवरती कारवाई करण्याचे निश्चित करण्यात आले आहे.
(२) (३) व (४) पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत प्राधिकरण कार्यक्षेत्रातील चाकण आणि आळंदी परिसरात मौजे-सोळु, मौ.धानोरे, मौ.मरकळ, मौ.च-होली खु., मौ.कुरूळी, मौ.मेदनकरवाडी, मौ.येलवडी, मौ.चांडोली, मौ.आंबेठाण इ. गावातील ले-आऊट मंजूर न करुन घेतलेले तथापि विकसन केलेल्या एकूण २८ अनधिकृत प्लॉटिंगचा/विकसन कामांचे सर्वेक्षण करण्यात आलेले असून एकूण १३ अनधिकृत भूखंड विकासकांना महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ५३(१) अन्वये नोटीस बजाविण्यात आलेली आहे. तसेच महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ५३(६)(अ) अन्वये नोटीसांचे अनुपालन न केल्यामुळे एका अनधिकृत प्लॉटधारक/विकासकावर स्थानिक पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच २ अनधिकृत विकासकांवर गुन्हे दाखल करणेकामी प्राधिकरणामार्फत कार्यवाही सुरू आहे.

-----------------

**विधान भवन :** 
**नागपूर.**

**राजेन्द्र भागवत**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.